**<u>गोपनीय</u>**

**क्रमांक : का.स./बैठक/२६०**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई – ४०० ०५१.

दिनांक : २२ जानेवारी, २०१९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०५ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या २६०व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२२/१/१९

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. जयंत कुमार बाँठिया
१००३/१००४, १० वा मजला,
बिल्डिंग नं.३-ए, ग्रीन एकर्स,
लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प.),
मुंबई – ४०० ०५३. - सदस्य

श्री. ना.वि.मेराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई – ४०० ०२५. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२. - सदस्य

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई – ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरिमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

महानगर आयुक्त, - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----xxx-----

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २६०वी बैठक

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **०५ जानेवारी, २०१९ (शनिवार)** |
| **वेळ** | **:** | **दुपारी १२.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. डी.के.जैन<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठीया | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये | - | सदस्य |
| श्री. लोकेशचंद्र<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. राजीव कुमार मितल
सचिव (व्यय),
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. बी.जी.पवार
सह महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. आर.के.शर्मा
संचालक (प्रणाली),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्रमोद अहुजा
संचालक (प्रकल्प/कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. डी.टी.ठुबे,
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसूमिली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती के.विजयालक्ष्मी
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि.न.कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा.म.गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दे.स.पाटोळे
प्रशासकीय अधिकारी,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय कृ.नानावटे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, श्री. अरुण बोंगीरवार, शासनाचे माजी मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर कार्यकारी समितीने श्री.बोंगीरवार यांच्या निधनाबद्दलच्या शोक ठरावास **(जोडपत्र)** मंजूरी दिली.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या २५९व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या २५९व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मेट्रो मार्ग २ब (डी.एन.नगर-मंडाळे) या मेट्रो मार्गाच्या उन्नत मार्ग व स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र.७ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

३.१. सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो बृहत् आराखड्यामधील ११८ कि.मी. मेट्रो मार्गांची जलद अंमलबजावणी करण्याकरीता प्राधिकरणाला दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या १३८व्या बैठकीत व मंत्रीमंडळाच्या दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर बृहत् आराखड्यामधील मेट्रो मार्ग-२ब (डि.एन. नगर-मंडाळे) प्रकल्पाकरीता एकूण रू.१०,९८६ कोटी व मेट्रो मार्ग-४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) प्रकल्पाकरीता रू.१४,५४९ कोटी किंमतीस राज्य शासनाने मान्यता दिली. या मेट्रो मार्ग २ब प्रकल्पासाठी साधारण सल्लागार म्हणून M/s. AICA Consortium यांची दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१६ रोजी नेमणूक करण्यात आली.

३.२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग क्र. २ब व ४ च्या नऊ पॅकेजसाठी (सी.ए. ०४ ते सी.ए. १२) च्या स्थापत्य बांधकामाकरीता ई-निविदा जानेवारी, २०१७ मध्ये मागविण्यात आल्या. पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा-क) उघडण्यात आल्यावर सर्व पॅकेजसाठी कंत्राटदारांनी अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा सुमारे २४ ते २५% अधिक देकार सादर केल्याचे निदर्शनास आले. मेट्रो स्थापत्य कामांसाठी सदर देकार जास्त दराचे असल्याने प्राधिकरणाने फेर निविदा मागविण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने, मेट्रो मार्ग-२ब च्या पॅकेज क्र.०६ व पॅकेज क्र.०७ च्या स्थापत्य बांधकामाकरीता (द्वितीय) फेर ई-निविदा दिनांक १९ नोव्हेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार प्राप्त झालेल्या आठ ई-निविदांच्या पात्रतेची तांत्रिक व वित्तीय छाननी करण्यात आली. त्या अनुषंगाने पॅकेज क्र.७ करिता लघुत्तम देकार (अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा ६.४४% कमी) सादर केलेला कंत्राटदार मे. गुंगडॉग- नीरज स्ट्रक्चरल सिमेंट लि.-पी.के.एच.एस. प्रा. लि - जे.व्ही. (मे. जी.एन.पी.) यांना स्वीकृती पत्र दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी देण्यात आले. सदर कंत्राटदारास वेळोवेळी मुदतवाढ देऊनही कंत्राटदाराने PBG (परफॉर्मन्स बँक गॅरंटी) व APBG (अतिरिक्त परफॉर्मन्स बँक गॅरंटी) सादर केली नाही. तसेच कंत्राटीय तरतुदीनुसार आवश्यक असलेले Undertakings, Guaranttees व Warrantees सादर केले नाही. त्या अनुषंगाने सदर कंत्राटदारास वारंवार मुदतवाढ देऊनसुध्दा PBG आणि APBG सादर केली नसल्यामुळे, सदर कंत्राटदारास स्वीकृती पत्र रद्द करण्याबाबत दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. तद्नंतर पॅकेज क्र.०७ करिता पात्रतेचे निकष व मार्गिकेत अंशत: बदल करून फक्त अनुभवी एकल निविदाकाराकडून (without JV) तृतीय फेर निविदा मागविण्यात आली.

३.३. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, पॅकेज क्र.०७ च्या स्थापत्य बांधकामाकरीता (तृतीय) फेर ई-निविदा दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पद्धतीनुसार निविदा पूर्व बैठक घेऊन उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेत स्थळांवर प्रसिद्ध करण्यात आले. या निविदांचा लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आला. उपरोक्त कामांसाठी खालील कंत्राटदारांनी ई-निविदा सादर केल्या. ई-निविदांच्या पात्रतेची व तांत्रिक छाननी मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार M/s. AICA Consortium यांच्या मार्फत करण्यात येऊन त्याचा अहवाल प्राधिकरणास

..५/-

दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी सादर करण्यात आला. सदर तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय लिफाफे (लिफाफा क-आर्थिक प्रस्ताव) दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व ई-निविदांची आर्थिक निकषांची छाननी मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार M/s. AICA Consortium यांच्या मार्फत करण्यात आली. सल्लागाराने दिनांक २० डिसेंबर, २०१८ रोजी सादर केलेल्या निविदा छाननी अहवालानुसार तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे:-

| अ. क्र. | कंत्राटदारांचे नाव | निविदेची रक्कम (रू.कोटी) | प्राप्त देकार (रू.) | % कमी/अधिक (-/+) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. सिंप्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ४२०.०८ | ४६२,३६,८६,३९६.२३ | + १०.०७% |
| २ | मे. जे.एम.सी. प्रोजेक्टस इंडिया लि. | | ४६४,६०,८४,७९९.२३ | + १०.६०% |
| ३ | मे. एन. सी.सी. लि. | | ४६०,७८,५७,५१९.४७ | + ९.६९% |

३.४. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, पॅकेज-०७ करीता मे. एन.सी.सी. लि. यांनी रु.४६०.७८ कोटी रक्कमेचा लघुत्तम देकार (अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा ४२०.०८ कोटीच्या ९.६९% अधिक दराचा) सादर केला आहे. वरील कंत्राटदार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा व रास्त असा अहवाल साधारण सल्लागार M/s. AICA Consortium यांनी सादर केलेला आहे. अतिरिक्त महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये (१) प्रकल्प संचालक- मेट्रो (२) वित्तीय सल्लागार (३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग (४) मुख्य अभियंता (नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा समावेश आहे. मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार M/s. AICA Consortium यांचा तांत्रिक व आर्थिक छाननी अहवाल सदर निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला. निविदा शिफारस समितीने दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार M/s. AICA Consortium यांनी सादर केलेल्या अहवालाचा विचार करून लघुत्तम देकार सादर केलेल्या मे. एन.सी.सी.लि. यांना वाटाघाटीसाठी दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी प्राधिकरणामध्ये बोलविण्यात आले. मे.एन.सी.सी.लि. यांनी असे नमुद केले की त्यांनी सादर केलेला देकार हा सर्व बाबींचा विचार करून व तुलनात्मकरित्या योग्य असून सादर केलेला देकार हा रास्त आहे. तरीही

निविदा शिफारस समितीने केलेल्या सूचनांचा विचार करून मे.एन.सी.सी.लि. यांनी देकार ९.६९ % वरून ९.२५% (०.४४% कमी) करण्यास सहमती दर्शवली. निविदाकाराने दिनांक २६ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये सादर केलेला सुधारित देकार पुढीलप्रमाणे आहे :-

| **कंत्राटदाराचे नाव** | **निविदेची रक्कम (रू.कोटी)** | **प्राप्त देकार (रू.कोटी)** | **% कमी/अधिक (-/+)** |
|---|---|---|---|
| मे. एन.सी.सी. लि. | ४२०.०८ | ४५८.९३ | +९.२५% |

मे.एन.सी.सी. लि. यांच्या अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा (रु.४२०.०८ कोटी) ९.२५% जास्त, रु.४५८.९३ कोटी रक्कमेचा देकार लघुत्तम आहे. या ई-निविदेला मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आला.

३.५. वरील प्रस्तावाबाबत चर्चा करताना श्री.जयंत बाँठीया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर टिपण्णीमध्ये नमूद केल्याप्रमाणे तृतीय फेर निविदा मागविताना पात्रतेचे निकष अंशत: बदलण्यात आले व फक्त अनुभवी एकल निविदाकाराकडून (without JV) निविदा मागविण्यात आली. परंतू इतर निविदा प्रक्रियेमध्ये JV स्थापित केलेले कंत्राटदार यशस्वीरीत्या काम करत असूनही फक्त अनुभवी एकल निविदाकाराकडून (without JV) निविदा मागविण्याचे का ठरविण्यात आले ? अशी विचारणा करण्यात आली. महानगर आयुक्त यांनी असा खुलासा केला की, पूर्वानुभवावरून असे निदर्शनास आले आहे की, कंत्राटदार अनुभवी कंत्राटदारासोबत JV स्थापित करतात जेणेकरून निविदेतील पात्रतेचे निकष पूर्ण करता येतील. परंतू वस्तूस्थितीत निविदा मिळाल्यानंतर अनुभवी कंत्राटदार कामात सहभागी होत नाही. त्यामुळे कामात अडचणी निर्माण होतात. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वरील कारणास्तव नवी मुंबई मेट्रो मार्गामध्ये कंत्राटदारासोबत करण्यात आलेला करारनामा रद्द करण्यात आला. त्यामुळे नवी मुंबई मेट्रोचे काम काही वर्षांपासून खोळंबले आहे. सबब तृतीय निविदा मागविताना फक्त अनुभवी एकल निविदाकार (without JV) पात्र ठरविण्यात आले. व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी याबाबतची सहमती दिली.

३.६. त्यानंतर, श्री. जयंत बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी या पुढे असा प्रश्न उपस्थित केला की, सदर देकारामध्ये GST (Goods & Services Tax) बाबत काय तरतूद करण्यात आली आहे. याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर अंदाजपत्रकातील किंमत व सादर केलेला देकार या दोन्हीमध्ये GST चा समावेश करण्यात आलेला आहे.

३.७. श्री. जयंत बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी त्यानंतर अशी विचारणा केली की, मे. गुंगडाँग- नीरज स्ट्रक्चरल सिमेंट लि.-पी.के.एच.एस. प्रा. लि - जे.व्ही. (मे. जी.एन.पी.) यांचा देकार हा अंदाजित किंमतीपेक्षा ६.४४% कमी असूनही या आधी सदर निविदा का स्विकारण्यात आली. सदर बाबत खुलासा करताना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, सदर कंत्राटदार हा निविदेतील सर्व पात्रतेचे निकष पूर्ण करीत असल्याने तसेच त्यांचा देकार लघुत्तम असल्याने सदर कंत्राटदारास स्विकृती पत्र देण्यात आले होते. निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे स्विकृती पत्र प्राप्त झाल्यानंतर PBG (परफॉर्मन्स बँक गॅरंटी) व APBG (अतिरिक्त परफॉर्मन्स बँक गॅरंटी) ३० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कत्रांटदारास २ महीन्यापर्यंत मुदतवाढ देण्यात आली. परंतू सदर कंत्राटदारास वेळोवेळी मुदतवाढ देऊनही कंत्राटदाराने परफॉर्मन्स बँक गॅरंटी (PBG) व अतिरिक्त परफॉर्मन्स बँक गॅरंटी (APBG) सादर केली नाही. तसेच कंत्राटीय तरतुदीनुसार आवश्यक असलेले Undertakings, Guaranttees व Warrantees सादर करु शकले नाहीत. त्या अनुषंगाने सदर कंत्राटदारास वारंवार मुदतवाढ देऊनसुध्दा PBG आणि APBG सादर केली नसल्यामुळे, सदर कंत्राटदारास स्विकृती पत्र रद्द करण्याबाबत कळविण्यात आले. तसेच सदर कंत्राटदाराने निविदा प्रक्रियेच्या वेळी सादर केलेली इसारा रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्याची व सदर कंत्राटदारास प्रतिबंध (debarment) करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

३.८. तद्नंतर, श्री. जयंत बाँठिया, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, मे.एन.सी.सी. लि. यांनी पूर्वी केलेल्या कामाची तपासणी करण्यात आली आहे का? यावर खुलासा करताना संचालक (प्रकल्प), मेट्रो अंमलबजावणी शाखा यांनी असे नमुद केले की, मे. एन.सी.सी. लि. प्राधिकरणाच्या मेट्रो मार्ग क्र.७ च्या पॅकेज क्र.३ वर काम करत असून सदर मार्गिकेचे ७०% काम पूर्ण झाले आहे. तसेच सदर कंत्राटदाराने बंगलुरू व नागपूर मेट्रोचे काम यशस्वीरीत्या केले आहे आणि पुणे मेट्रोचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पामधील मे.एन.सी.सी.लि. चे काम समाधानकारक आहे. मे.एन.सी.सी.लि. ने सादर केलेला अंतिम वित्तीय प्रस्ताव रास्त व वाजवी असून कार्यकारी समितीस तशी शिफारस करण्यात आली.

..८/-

**निर्णय :** <u>सविस्तर चर्चेनंतर, बाब टिपणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>

**<u>ठराव क्र.१३६२ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत मेट्रो मार्ग-२ब प्रकल्पाच्या पॅकेज-७ साठी मे.एन.सी.सी.लि. यांचा सर्व करांसहीत रु.४५८,९३,७४,०००/- रक्कमेच्या लघुत्तम देकाराची (अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा ९.२५% जास्त दराचा) ई-निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**<u>बाब क्र.४</u> :** **<u>मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या मेट्रो मार्ग ७, अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) मार्गिकेवरील १३ (तेरा) उन्नत स्थानकांमधील विद्युत व यांत्रिकी या कामाकरीता मागविलेल्या ई-निविदांना मान्यता मिळणेबाबत.</u>**

४.१. सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुंबई मेट्रो प्रकल्प मेट्रो लाईन ७ वरील १३ उन्नत स्थानकांच्या विद्युत व यांत्रिकी (E&M) कामाकरीता मे.स्टर्लिंग अँन्ड विल्सन प्रा.लि., मुंबईचा लघुत्तम (L१) देकार कार्यकारी समितीच्या बैठकीत सादर केला असून, लघुत्तम देकार रु.५०,४६,१७,९४८.१० (रुपये पन्नास कोटी सेहेचाळीस लाख सतरा हजार नऊशे अठ्ठेचाळीस व दहा पैसे मात्र) जो की अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा १०% ने कमी असून, निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा वाजवी व व्यवहार्य असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

४.२. सदस्यांनी अशी विचारणा केली की, प्रकल्प अहवालामध्ये इतर बाबी/ कामे समाविष्ट आहेत का व असतील तर त्यांची सद्य:स्थिती काय आहे ? त्यावर असे स्पष्टीकरण देण्यात आले की, तपशील प्रकल्प अहवालामध्ये विद्युत व यांत्रिकी कामांकरिता रु.१५८.३३ कोटी रक्कमेची तरतूद केलेली आहे.

सदर रक्कमेमध्ये उद्वाहक व सरकता जिना ह्या अजून दोन कामांचा समावेश आहे. ह्या दोन्ही कामांच्या कार्यक्षेत्रातील निविदाकार भिन्न असल्यामुळे या दोन्ही कामांकरिता वेगवेगळी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. दोन्ही निविदा वेगवेगळया मागविण्यात आल्या आणि त्यांची किंमत रु.५० कोटी पेक्षा कमी असल्यामुळे प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात त्या दिनांक २७ डिसेंबर, २०१८ रोजी पुरस्कृत करण्यात आल्या.

४.३. तपशील प्रकल्प अहवालाच्या किंमती मधील विद्युत व यांत्रिकी कामाकरिता (उद्वाहक व सरकता जिना वगळून) प्रमाणित रक्कम रु.५६.०६ कोटी एवढी आहे. पुढे असेही स्पष्टीकरण देण्यात आले की, निविदा जारी करताना साधारण सल्लागाराने पुनरावलोकन/अद्ययावत करुन रु.५६.०६ कोटींचे अंदाजपत्रक तयार केले, जे वास्तविक रित्या DMRC च्या फेज-३ (सी.ई. लॉट १) (मे, २०१८ पर्यंत अद्ययावत) शेवटचा स्विकारार्ह दर (LAR) वर आधारित होते.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला आहे :-**

**<u>ठराव क्र. १३६३ :-</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेट्रो मार्गिका-७ वरील १३ (तेरा) उन्नत स्थानकासाठी मे.स्टर्लिंग अँन्ड विल्सन प्रा. लि. रु.५०,४६,१७,९४८.१० (रु.पन्नास कोटी सेहेचाळीस लाख सतरा हजार नऊशे अठ्ठेचाळीस व दहा पैसे मात्र) जो की, अंदाजित रक्कमेच्या १०% पेक्षा कमी आहे व तो स्विकारण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..१०/-

**<u>बाब क्र.५</u> : <u>मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या मेट्रो मार्ग २अ (दहिसर पूर्व ते डी.एन.नगर), २ब (डी.एन.नगर ते मंडाले) आणि मार्ग ७ (अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व) मार्गिकेवर ५२ (बावन्न) उन्नत स्थानकांमधील स्वयंचलित भाडे संकलन (AFC) आणि AFC OCC, AFC सॉफ्टवेअर चाचणी व विकास केंद्र (SDC) यांचे संरचना (डिझाईन), सत्यापन, पुरवठा, स्थापना, चाचणी व कार्यान्वित (कमिशनिंग) करणे (सीए-३३) या कामाकरीता मागविलेल्या ई-निविदांना मान्यता मिळणेबाबत.</u>**

५.१. सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या मेट्रो मार्ग २अ, २ब आणि मार्ग-७ मार्गिकेवरील ५२ (बावन्न) उन्नत स्थानकांमधील स्वयंचलित भाडे संकलन (AFC) या कामाकरिता कन्सोर्टियम ऑफ मे. डाटामॅटिक्स ग्लोबल सर्व्हिसेस लि. आणि मे.ए.ई.पी.टिकिटिंग सोल्यूशन एस.आर.एल.यांनी सादर केलेली लघुत्तम दराची समतुल्य रक्कम रुपये १५९,९९,८६,९७४.६७ (अक्षरी रुपये एकशे एकोणसाठ कोटी नव्याण्णव लाख शहाऐंशी हजार नऊशे चौऱ्याहत्तर व सदुसष्ट पैसे मात्र) एवढ्या किंमतीची निविदा, अंदाजित किंमतीच्या २५.८२% कमी आहे. त्यांनी उद्धृत केलेले दर वाजवी आणि व्यवहार्य आहेत. या लघुत्तम निविदेला मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

५.२. प्रकल्प संचालक (प्रणाली), मेट्रो अंमलबजावणी शाखा यांनी असे सांगितले की, कंपनीला दळणवळण क्षेत्रामध्ये टिकिटिंग सोल्युशन्सचे काम करण्याचा अनुभव आहे आणि त्यांनी उद्धृत केलेले दर वाजवी आणि व्यवहार्य आहेत, ह्याची पुन्हा पडताळणी प्राधिकरणाने पत्राद्वारे केलेली आहे. कन्सोर्टियम ऑफ मेसर्स डेटामेटिक्स ग्लोबल सर्विसेस लिमिटेड आणि मेसर्स एइपी टिकिटिंग सोल्युशन्स एस.आर.एल. यांनी त्यांच्या दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या पत्रानुसार याबाबत असे स्पष्टिकरण दिले की, बाजारातील स्पर्धात्मक वातावरण, कामाचे प्रमाण आणि बोलीदाराची मुंबईतील स्थानिक उपस्थिती यामुळे त्यांच्याकडून उद्धृत केलेले दर वाजवी आणि व्यवहार्य आहेत. बोलीदाराकडून देण्यात आलेल्या स्पष्टीकरणास अनुसरुन सामान्य सल्लागार यांनी कमी दराच्या बोलीबाबत त्यांच्या दृष्टीने स्वयंचलित भाडे संकलन यंत्रणेच्या हार्डवेअरच्या किंमतीमध्ये झालेली घट, कन्सोटियम यांचे मुख्य भागीदार हे मुंबईत स्थित असल्यामुळे वाहतुकीच्या खर्चात बरीच बचत होणार आहे. दुसऱ्या क्रमांकाची न्यूनतम बोलीची निविदा सादर करणाऱ्या निविदाकारांनी अंदाजित किंमतीपेक्षा १९.४४% कमी दराची निविदा सादर केली असून, ती प्रथम क्रमांकाच्या न्यूनतम बोलीपेक्षा ६.३८% एवढ्या चढ्या दराची आहे. याचाच अर्थ निविदा प्रक्रियेमध्ये सदृढ स्पर्धा झालेली आहे.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला आहे :-**

**ठराव क्र. १३६४ :-**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज सीए-३३ साठी कन्सोर्टियम ऑफ मेसर्स डेटामेटिक्स ग्लोबल सर्विसेस लिमिटेड आणि मेसर्स एइपी टिकिटिंग सोल्युशन्स एस.आर.एल. यांचा रु.१५९,९९,८६,९७४.६७ (अक्षरी रुपये एकशे एकोणसाठ कोटी नव्याण्णव लाख शहाऐंशी हजार नऊशे चौऱ्यात्तर व सदुसष्ट पैसे मात्र) सर्व करांसहित रक्कमेचा लघुत्तम देकार जो अंदाजित किंमतीच्या २५.८२% कमी आहे, स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिवास करण्यात मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ :** **विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रा.म.क्र.३५ या अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील साईबाबा मंदिर ते फॉरेस्टनाका रस्त्याचे अतिक्रमणे विरहीत जागेत रस्ता रुंदीकरणासह गटाराचे बांधकाम करण्याच्या कामाच्या प्रथम लघुत्तम निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

६.१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रा.म.क्र. ३५ च्या अंबरनाथ नगर परिषद हद्दितील साईबाबा मंदिर ते फॉरेस्ट नाका रस्त्याचे अतिक्रमणे विरहित जागेत रस्ता रुंदीकरणासह गटाराचे बांधकाम करणे, या रस्त्याचे कामास सुमारे रु.३५.० कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी दिनांक १६ मार्च, २०१७ रोजीच्या टिप्पणी अन्वये मान्यता दिली आहे. सदर प्रशासकीय मान्यता ढोबळ स्वरुपात असून लोकप्रतिनिधीमार्फत प्रस्ताव सादर करताना अशा किंमती दर्शविल्या जातात.

६.२. या अनुषंगाने महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली होती. सल्लागाराने तांत्रिक अभ्यास करुन सदर रस्त्याचे अंदाजपत्रक ३० मीटर डी.पी. प्रमाणे अस्तित्वातील काँक्रिट रस्ता सोडून उर्वरीत रस्त्याच्या भागात ३ पदरी रुंदीकरण करणे प्रस्तावित केले आहे. रस्त्याच्या दुतर्फा २.५ मी.रुंदीच्या साईट पट्टयासह आवश्यक त्या पर्जन्य जलवाहिन्याचे बांधकाम करणे. तसेच पथदिवे बसविणे, बाधित जलवाहिन्या (वेगवेगळया व्यासाच्या) स्थलांतरीत करणे, १२ मोठया मोऱ्यांचे रुंदीकरण करणे, बाधित कमी/उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्या स्थलांतरीत करणे इत्यादी बाबी देखील समाविष्ट केल्या आहेत. सदर कामाची सुधारीत किंमत रु.५६.९८ कोटी (जीएसटीसह) एवढी असून, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर कामाचा सुधारीत खर्च रु.५६.९८ कोटीस दिनांक ०२ एप्रिल, २०१८ रोजी मंजुरी दिली.

६.३. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, विषयांकित कामासाठी विहित मुदतीत ६ निविदाकारांनी स्वारस्य दाखविले व ई-निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत निविदा संच शुल्क व इसारा रक्कम अदा करुन एकूण ६ निविदाकारांनी निविदा सादर केल्या. त्यापैकी २ कंत्राटदारांकडून, १) मे. देवकर यांच्याकडून निविदा अटी व शर्ती इत्यादींची पूर्तता न केल्यामुळे उदा. रु.३५.०८ कोटींचे कोणत्याही एका रस्त्याचे काम केल्याबद्दलचे प्रमाणपत्र किंवा रु.२१.९२ कोटींचे कोणत्याही दोन रस्त्याचे/महामार्गाचे काम केल्याचे प्रमाणपत्र इ. सादर न करु शकल्यामुळे त्यांची निविदा बाद ठरविण्यात आली. तसेच २) मे.नविन मेरीको इंजिनियर्स प्रा.लि. यांनी अटी व शर्तीनुसार कोणत्याही एका कामासाठी रु.३५.९२ कोटीचे रस्त्याचे काम किंवा रु.२१.३२ कोटीचे रस्त्याचे/महामार्गाचे दोन कामे केल्याचा अनुभव प्रमाणपत्र देऊ न शकल्यामुळे निविदा समितीमार्फत दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ रोजी त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली. उर्वरीत ४ पात्र कंत्राटदारांच्या निविदा दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ रोजी उघडण्यात आल्या. त्यांच्या देकाराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | वस्तु व सेवाकरासहीत निविदा रक्कम | शेरा | १२ % वस्तु व सेवाकर वगळून निविदा रक्कम | सेवाकर वजा करुन वगळून टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | **मे. जे.पी. इन्टरप्रायझेस** | रु. ५१,८२,२४,६४४/- | १८.१८% अधिक दर | रु. ४५,६०,३७,६८७/- | ६.१८% अधिक दर |
| २. | मे. लॅन्डमार्क कॉर्पोरेशन प्रा.लि. | रु. ५३,२७,८२,९९४/- | २१.५०% अधिक दर | रु. ४६,८८,४९,०३५/- | ९.५% अधिक दर |
| ३. | मे. वितराग इन्फ्राप्रोजेक्ट लि. | रु. ५३,७१,६८,०३९/- | २२.५०% अधिक दर | रु.४७,२७,०७,८७४/- | १०.५% अधिक दर |

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | वस्तु व सेवाकरासहीत निविदा रक्कम | शेरा | १२ % वस्तु व सेवाकर वगळून निविदा रक्कम | सेवाकर वजा करुन वगळून टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ४. | मे. आर.ई. इन्फ्राप्रा.लि. | रु. ५४,८०,८६,८०२/- | २४.९९% अधिक दर | रु. ४८,२३,१६,३८६/- | १२.९९% अधिक दर |

६.४. महानगर आयुक्त यांनी प्रथम लघुत्तम निविदाकार मे.जे.पी.इन्टरप्रायझेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (१८.१८%) अधिक दराची निविदा योग्य असल्याने मान्यतेचा प्रस्ताव सादर केला व अधिक दराबाबत खालीलप्रमाणे खुलासा केला :-

अ) कंत्राटदाराने सादर केलेल्या निविदेतील दरामध्ये १२% वस्तू व सेवा कराचा अंतर्भाव असून मूळ अंदाजपत्रकातील किंमतीमध्ये त्याचा समावेश नव्हता.

ब) सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन २०१७-१८ च्या दरसूची प्रमाणे तयार करण्यात आले होते व सद्य:स्थितीतील प्रचलित दरसूची २०१८-१९ प्रमाणे अंदाजपत्रकीय किंमतीमध्ये १३.१७% भाववाढ झालेली आहे.

वरील दोन्ही बाबीच्या अनुषंगाने कंत्राटदाराने सादर केलेली निविदाही सध्याच्या प्रचलित दरसूचीपेक्षा -७.१७% कमी दराची आहे.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३६५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेशांतर्गत येणाऱ्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रा.म.क्र.३५ या अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील साईबाबा मंदिर ते फॉरेस्टनाका रस्त्याचे अतिक्रमणे विरहित जागेत रस्ता रुंदीकरणासह गटाराचे बांधकामाकरीता मे. जे.पी.इन्टरप्रायझेस यांची लघुत्तम निविदा रक्कम रु.५१,८२,२४,६४४/- (१८.१८% अधिक दर व वस्तू व सेवाकरासह) (रुपये एकावन्न कोटी ब्याऐंशी लक्ष चोवीस हजार सहाशे चव्वेचाळीस फक्त) स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही योग्य त्या सर्व फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : संचालक (प्रकल्प/कामे) पदावरील नेमणूकीबाबत.**

७.१. या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात एकूण ११८ कि.मी. उन्नत मेट्रो मार्ग अग्रक्रमाने राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता विचारात घेता प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीत ठराव क्र.१३८२ अन्वये सदर प्रकल्पाकरीता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर तांत्रिक संवर्गात नव्याने पदे निर्माण करण्यात आली आहेत. यापैकी संचालक (प्रकल्प/कामे) वेतनश्रेणी पीबी IV रु.३७४००-६७००० ग्रेड वेतन रु.१०,०००/- पदावरील नेमणूकीसाठी कार्यकारी समितीच्या २५६व्या बैठकीतील ठराव क्रमांक १३४३ अन्वये महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

७.२. सदर पदावर नेमणूकीसाठी निवड करण्यात आलेले उमेदवार श्री.डी.राधाकृष्णन रेड्डी रुजू न झाल्याने प्रतिक्षासूचीवरील उमेदवार श्री. प्रमोद अहूजा, दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना प्राधिकरणामध्ये प्रतिनियुक्तीवर पाठविण्याचा प्रस्ताव त्यांच्या मूळ विभागाला पाठविण्यात आला. त्यानुसार श्री.अहूजा दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी संचालक (प्रकल्प/कामे) या पदावर रुजू झाले.

७.३. "संचालक (प्रकल्प/कामे)" वेतनश्रेणी पी.बी.-IV रु. ३७४००-६७००० + ग्रेड पे रु. १०,०००/- हे पद विभाग प्रमुख व त्यावरील दर्जाचे असल्याने सदर पदावर नेमणूक करण्याचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३६६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकस प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप-कलम (३) पोट-कलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे बाब

टिप्पणीमध्ये उल्लेख केलेल्या प्रस्तावानुसार "संचालक (प्रकल्प/कामे)" पी.बी.-IV रु.३७४००-६७०००+ग्रेड पे रु.१०,०००/- या वेतनश्रेणीतील पदावर श्री. प्रमोद अहूजा यांच्या प्रतिनियुक्तीने नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मुख्य अभियंता (विद्युत) या पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करणेबाबत.**

८.१. या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात अग्रक्रमाने राबविण्यात येणाऱ्या मेट्रो प्रकल्पाच्या कामासाठी तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता विचारात घेता, प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नव्याने पदे निर्माण करण्यात आली आहेत. प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीत ठराव क्र.१३८२ अन्वये मुख्य अभियंता (विद्युत) वेतनश्रेणी रु.३७४००-६७०००+ग्रेड वेतन रु.८९००/- या संवर्गात प्राधिकरणाच्या आस्थापनेवर तांत्रिक संवर्गात १ पद निर्माण करण्यात आले असून दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १४५व्या बैठकीत ठराव क्रमांक १४६४ अन्वये आणखी १ पद निर्माण करण्यात आले आहे.

८.२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या २५४व्या बैठकीतील ठराव क्रमांक १३३३ अन्वये मुख्य अभियंता (विद्युत) या पदाच्या सेवाप्रवेश नियमास मंजूरी देण्यात आली आहे. परंतु सदर पदाकरीता लागणारा विशिष्ट अनुभव विचारात घेता, या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील अनुभवाच्या अर्हतेमध्ये बदल सुचविण्यात आला. त्यानुसार "मुख्य अभियंता (विद्युत)" या पदाचे सुधारीत सेवाप्रवेश नियम खालीलप्रमाणे :-

| **विद्यमान सेवाप्रवेश नियम** | **सुधारीत सेवाप्रवेश नियम** |
|---|---|
| मुख्य अभियंता (विद्युत) | मुख्य अभियंता (विद्युत) |
| वेतनश्रेणी PB IV रु. ३७४००-६७००० + ग्रेड वेतन रु.८,९००/- | वेतनश्रेणी PB IV रु. ३७४००-६७००० + ग्रेड वेतन रु.८,९००/- |

| विद्यमान सेवाप्रवेश नियम | सुधारीत सेवाप्रवेश नियम |
|---|---|
| **Appointment shall be made either :-**<br><br>a. By Promotion of a suitable candidate on the basis of selection from amongst the Additional Chief Engineer in MMRDA who possess Degree of a statutory university in Electrical Engineering and experience as mentioned in (c) below.<br><br>Or<br><br>b. By deputation from Government Department or Semi-Govt organization including public sector undertaking, if they possess the qualifications and experience prescribed in (c) below<br><br>Or<br><br>c. By selection from amongst the candidate who possess the following :- | **Appointment shall be made either :-**<br><br>a. By Promotion of a suitable candidate on the basis of selection from amongst the Additional Chief Engineer in MMRDA who possess Degree of a statutory university in Electrical Engineering and experience as mentioned in (c) below.<br><br>Or<br><br>b. By deputation from Government Department or Semi-Govt organization including public sector undertaking, if they possess the qualifications and experience prescribed in (c) below<br><br>Or<br><br>c. By selection from amongst the candidate who possess the following :- |
| **Educational Qualification :-**<br><br>Degree in Electrical Engineering from a Recognized and reputed University/ Institute. | **Educational Qualification :-**<br><br>Degree in Electrical Engineering from a Recognized and reputed University/ Institute. |
| **Experience :-**<br><br>Appointment shall be made of a suitable candidate as below –<br><br>Candidate should be working in PB-4 of CDA Grade of Rs.37400-67000 with GP – Rs.8700 for a minimum period of 2 years or PB-3 pay scale Rs.15600-39100 with GP – Rs.7600 working with 7 years service in Group A in CDA scale or equivalent scale with "desirable" experience given below –<br><br>OR<br><br>Total minimum 18 years experience in reputed Private sector in Executive grade in "desirable" domain for the post.<br><br>OR<br><br>SAG/Non functional (NF) – SAG, of IRSEE (Indian Railways Service of Electrical Engineers) Cadre of Indian Railways. | **Experience :-**<br><br>Appointment shall be made of a suitable candidate as below –<br><br>Candidate should be working in PB-4 of CDA Grade of Rs.37400-67000 with GP – Rs.8700 (pre revised)/ SG/IRSEE officer of railway service for a minimum period of 2 years or PB-3 pay scale Rs.15600-39100 with GP – Rs.7600 JAG/IRSEE officer working for 5 years service in Group A in CDA scale or equivalent scale with 18 years length of service with "desirable" experience given below–<br><br>OR<br><br>Total minimum 18 years experience in Executive grade in Govt entities like railway PSUs/Metro etc. in "desirable" domain for the post.<br><br>OR<br><br>SAG/Non functional (NF) – SAG of IRSEE (Indian Railways Service of Electrical Engineers) Cadre of Indian Railways.<br><br>OR<br><br>Total minimum 18 years experience in reputed Private sector in Executive grade in "desirable" domain for the post. |

| विद्यमान सेवाप्रवेश नियम | सुधारीत सेवाप्रवेश नियम |
|---|---|
| **Desirable :-**<br>i. Candidate should have experience of working in construction projects of Railways/ Metros/other PSUs/Private sector dealing with Rolling Stock.<br>ii. Candidate should be conversant with international competitive bidding, computerized environment working and latest Rolling Stock technologies including Electric General Services, Electric Traction etc.<br>iii. Adequate experience in planning, designing, supplying, testing & commissioning of Rolling Stock, Electric General Services and Electric Traction etc. for elevated Metro/Rail Projects in Urban & Suburban environment including consultancy works related to Urban Rail projects.<br>iv. Candidates with experience of working of modern Urban Rail systems will be preferred. | **Desirable :-**<br>i. Candidate should have experience of working in construction projects of Railways/ Metros/other PSUs/Private sector dealing with Rolling Stock.<br>ii. Candidate should be conversant with international competitive bidding, computerized environment working and latest Rolling Stock technologies including Electric General Services, Electric Traction etc.<br>iii. Adequate experience in planning, designing, supplying, testing & commissioning of Rolling Stock, Electric General Services and Electric Traction etc. for elevated Metro/Rail Projects in Urban & Suburban environment including consultancy works related to Urban Rail projects.<br>iv. Candidates with experience of working of modern Urban Rail systems will be preferred. |
| **Age :-**<br>No age limit if the post is filled by promotion or by deputation. In case of appointment by selection candidate should Not be more than 55 years. No age limit for MMRDA employees. | **Age :-**<br>No age limit if the post is filled by promotion or by deputation. In case of appointment by selection candidate should not be more than 55 years. No age limit for MMRDA employees. |

"मुख्य अभियंता (विद्युत)" वेतनश्रेणी पी.बी.-IV रु. ३७४००-६७००० + ग्रेड पे रु. ८,९००/- हे पद विभाग प्रमुख दर्जाचे असल्याने सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करण्याचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

<u>ठराव क्र.१३६७ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकस प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीमध्ये उल्लेख केलेल्या प्रस्तावानुसार प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मुख्य अभियंता (विद्युत)" या पदाच्या सेवाप्रवेश नियमाच्या अनुभवाच्या अर्हतेमध्ये बदल करुन त्याप्रमाणे सुधारीत सेवाप्रवेश नियम निर्गमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

..१८/-

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील विभाग प्रमुख व इतर पदांच्या नेमणूकीसाठी सुधारीत निवड व पदोन्नती समिती गठीत करण्यास मान्यता देण्याबाबत.**

९.१. या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशामध्ये प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या मेट्रो, मुंबई पारबंदर रस्ता, बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका, मोनोरेल, पाणी पुरवठा प्रकल्प, विविध पायाभूत सुविधा प्रकल्प अशा विविध महत्वाकांक्षी प्रकल्पांची अंमलबजावणीकरीता मोठ्या प्रमाणात तांत्रिक आणि प्रशासकीय स्वरुपाची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. उपरोक्तप्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार सदर पदे सरळसेवा/प्रतिनियुक्ती आणि पदोन्नतीद्वारे भरण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे निवड समिती आणि पदोन्नती समिती निर्माण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले.

अ. तांत्रिक स्वरुपाची पदे सरळसेवा/प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याकरीता खालीलप्रमाणे निवड समिती गठित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले :-

| अ. क्र. | तांत्रिक पदाकरीता निवड समिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. राहुल अस्थाना, माजी महानगर आयुक्त | अध्यक्ष |
| २. | भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) (क्षेत्रनिहाय) किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३. | **संबंधीत क्षेत्रातील खालीलपैकी एक** | |
| | **मेट्रो प्रकल्पामधील पदांकरीता** | सदस्य |
| | अ) स्थापत्य क्षेत्रातील पदांकरीता - संचालक (प्रकल्प) | |
| | ब) प्रणाली क्षेत्रातील पदांकरीता - संचालक (प्रणाली) | |
| | **पायाभूत सुविधा प्रकल्पातील पदांकरीता** | |
| | अ) स्थापत्य क्षेत्रातील पदांकरीता - प्रमुख अभियांत्रिकी | |
| | ब) परिवहन नियोजन क्षेत्रातील पदांकरीता - प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग | |
| | क) नियोजन क्षेत्रातील पदांकरीता - प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग | |
| ४. | प्रमुख, नियोजन विभाग **(महिला प्रतिनिधी)** | सदस्य |
| ५. | वित्तीय सल्लागार, वित्त व लेखा विभाग | सदस्य |

..१९/-

| | | |
|---|---|---|
| ६. | उप-महानगर आयुक्त (प्रशासन) | सदस्य |
| ७. | श्री. पी.एम.यादव, अति.प्रमुख (नगर रचना) **(मागासवर्गीय प्रतिनिधी)** | सदस्य |
| ८. | प्रशासकीय अधिकारी | सचिव |

ब. प्रशासकीय पदे सरळसेवेद्वारे भरण्याकरीता खालीलप्रमाणे निवड समिती गठित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले :-

| **अ.क्र.** | **प्रशासकीय पदाकरीता निवड समिती** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्री. राहुल अस्थाना, माजी महानगर आयुक्त | अध्यक्ष |
| २. | संबंधित विभागाचे प्रमुख | सदस्य |
| ३. | प्रमुख, नियोजन विभाग **(महिला प्रतिनिधी)** | सदस्य |
| ४. | वित्तीय सल्लागार, वित्त व लेखा विभाग | सदस्य |
| ५. | उप-महानगर आयुक्त (प्रशासन) | सदस्य |
| ६. | श्री. पी.एम.यादव, अति.प्रमुख (नगर रचना) **(मागासवर्गीय प्रतिनिधी)** | सदस्य |
| ७. | प्रशासकीय अधिकारी | सचिव |

क. तांत्रिक आणि प्रशासकीय स्वरुपाची पदे पदोन्नतीने भरण्याकरीता खालीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठीत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले :-

| **अ.क्र.** | **विभागीय पदोन्नती समिती** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्री. राहुल अस्थाना, माजी महानगर आयुक्त | अध्यक्ष |
| २. | संबंधित विभागाचे प्रमुख | सदस्य |
| ३. | प्रमुख, नियोजन विभाग **(महिला प्रतिनिधी)** | सदस्य |
| ४. | वित्तीय सल्लागार, वित्त व लेखा विभाग | सदस्य |
| ५. | उप-महानगर आयुक्त (प्रशासन) | सदस्य |
| ६. | श्री. पी.एम.यादव, अति.प्रमुख (नगर रचना) **(मागासवर्गीय प्रतिनिधी)** | सदस्य |
| ७. | प्रशासकीय अधिकारी | सचिव |

९.२. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणामधील तांत्रिक आणि प्रशासकीय पदे सरळसेवा/प्रतिनियुक्ती आणि पदोन्नतीद्वारे भरण्याकरीता जेष्ठ सनदी अधिकारी आणि प्राधिकरणाचे माजी महानगर आयुक्त, श्री.राहुल अस्थाना यांची निवड समिती आणि पदोन्नती समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या (IIT) अभियांत्रिकी क्षेत्रातील अधिष्ठाता (Dean)/प्राध्यापक यांना तज्ञ प्रतिनिधी म्हणून निवड समितीमध्ये नियुक्त करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. उपरोक्त समिती प्राधिकरणामधील तांत्रिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील विभाग प्रमुख व इतर पदे सरळसेवा/प्रतिनियुक्ती आणि पदोन्नतीद्वारे निवड

प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी गठीत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. तसेच प्रसंगानुरुप समितीमध्ये आणि/अथवा समितीच्या सदस्यांमध्ये बदल जसे की, नवीन सदस्य अंतर्भूत करणे आणि/अथवा गठीत समितीतील सदस्य नामनिर्देशित करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रसंगानुरुप आणि प्रकरणपरत्वे संबंधित पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस (सरळसेवेने/प्रतिनियुक्तीने/पदोन्नतीने) कार्यकारी समितीची कार्योत्तर मान्यता घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले. तसेच प्रस्तावित निवड समितीचे अध्यक्ष व भारतीय तंत्रज्ञान संस्थेमधील तज्ञ सदस्य यांना मानधन ठरविण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३६८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील विभाग प्रमुख व इतर पदांच्या नेमणूकीसाठी सुधारीत निवड व पदोन्नती समिती गठीत करण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग हे पद पदोन्नतीने भरण्यास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत.**

१०.१. या प्रस्तावाबाबत माहिती देताना, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, **"प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग"** हे पद पूर्वीपासून प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील मंजूर पद असून, सदर पद दिनांक ०१ जुलै, २०१८ पासून रिक्त आहे. **प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग** हे पद विभाग प्रमुखांचे पद असल्याने सदर पदावर नेमणूक करावयाचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत.

सेवाप्रवेश नियमानुसार प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग हे पद पदोन्नतीने भरण्याकरीता "सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)", "अति.प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन)", "अति.प्रमुख (अर्बन डिझाईन)" या संवर्गातील अधिकाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला.

१०.२. महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, सदर पद पदोन्नतीने भरण्याकरीता अति.महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली :-

| अनु.क्र. | विभागीय पदोन्नती समिती | पदनाम |
|---|---|---|
| १. | अति.महानगर आयुक्त/प्रकल्प संचालक | अध्यक्ष |
| २. | संचालक (प्रणाली) मेट्रो | सदस्य |
| ३. | संचालक (प्रकल्प) मेट्रो | सदस्य |
| ४. | कार्यकारी अभियंता (श्री.दाभोळकर) | मागासवर्गीयांचे प्रतिनिधी |
| ५. | उप-महानगर आयुक्त (प्रशासन) | सदस्य |
| ६. | प्रशासकीय अधिकारी | सदस्य सचिव |

१०.३. महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, विभागीय पदोन्नती समितीने प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्याकरीता खालील अधिकाऱ्यांची प्राधान्याने शिफारस केली :-

१) श्री. शंकर देशपांडे, सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन)
२) श्री. मोहन सोनार, अति.प्रमुख, (नगर व क्षेत्र नियोजन)

उपरोक्त दोन अधिकाऱ्यांपैकी श्री.शंकर देशपांडे, सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन) यांचा रु.३७,४००-६७,००० + ग्रे.वे. रु.८,७००/- या वेतनश्रेणीत सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन) या पदावर १० वर्षे ८ महिन्याचा आणि श्री.मोहन सोनार, अति.प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन) यांचा रु.३७,४००-६७,००० + ग्रे.वे. रु.८,७००/- या वेतनश्रेणीतील अति.प्रमुख (नगर व क्षेत्र नियोजन) या पदावर १ वर्षे ८ महिन्याचा अनुभव आहे. ही बाब विचारात घेऊन श्री.शंकर देशपांडे, सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन) यांची प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ पासून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या तसेच कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली आहे. तरी उपरोक्त प्रस्ताव कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

..२२/-

**निर्णय :** **बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३६९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती बाब टिप्पणीमध्ये उल्लेख केलेल्या प्रस्तावानुसार श्री.शंकर चं. देशपांडे, सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन) यांचा सह प्रकल्प संचालक (नगर नियोजन) या पदावरील १० वर्ष ८ महिन्याचा अनुभव ग्राह्य धरुन त्यांची प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ पासून दिलेल्या पदोन्नतीस याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे. तसेच सदर पदोन्नतीकरीता दिनांक १२ डिसेंबर, २०१८ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीस याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे".

**बाब क्र.११अ : दिनांक ३०.०६.२०१८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय :** **प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**बाब क्र.११ब : दिनांक ३०.०९.२०१८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय :** **प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यांस कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

..२३/-

**बाब क्र.१२अ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक ०१ जुलै, २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने १ जुलै, २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने १ जुलै, २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय : सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.१२ब : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाने १ ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती देताना प्राधिकरणाच्या एकूण ठेवीपैकी जवळपास ९०% ठेवी या खाजगी बँकाचा व्याजाचा दर जास्त असल्याने खाजगी बँकेत आहेत. खाजगी बँकेच्या ठेवींच्या दराची तुलना राष्ट्रीयकृत बँकेशी केल्यास साधारणत: १ ते १.५% पर्यंत तफावत असल्याने राष्ट्रीयकृत बँकाकडील ठेवीचे प्रमाण अत्यल्प आहे. प्राधिकरणाच्या काही ठेवी या राष्ट्रीय बँकेत गुंतवणेही आवश्यक वाटते. या बाबींचा विचार करुन यापुढे ३०% पर्यंत ठेवी राष्ट्रीयकृत बँकाना देण्याचे प्रस्ताव आहे, त्यास कार्यकारी समितीने सहमती दर्शविली. त्यानंतर कार्यकारी समितीने १ जुलै, २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय : सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.१३ : मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल - दिनांक ०१ एप्रिल, २०१८ ते ३० सप्टेंबर, २०१८.**

१३.१. मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ एप्रिल, २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

..२४/-

**पटल बाब क्र.१ :** **<u>विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी किल्ल्याजवळील सहा पदरी पुलाचे बांधकाम करणे या कामाची सद्य:स्थिती.</u>**

महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस सदर कामाची सद्य:स्थिती अवगत करताना असे सादर केले की, कार्यकारी समितीच्या दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या २४७व्या बैठकीमधील ठराव क्र.१२९६ यास अनुसरुन मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या कंत्राटदारास सदर काम २४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यासाठी दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आला होता. तथापी, सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात केल्यानंतर, भारतीय जलमार्ग अधिनियम, २०१६ (National Waterway Act, २०१६) अन्वये, ज्या नदीपात्रावर सदर पूल प्रस्तावित आहे, त्या उल्हास नदीस, भारतीय जलमार्ग (National Waterway-५३) म्हणून जाहीर करण्यात आला. त्यामुळे नौकावहन गाळयांची लांबी वाढविणे तसेच यापुर्वी दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१५ रोजी सदर पुलाच्या बांधकामास देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचे नमूद करुन इतर अटींसह महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत दिनांक ०९ मे, २०१७ रोजी सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले. त्यामुळे प्रस्तावित पुलाच्या संरचनेमध्ये (Structural Design) व आखणीमध्ये बदल करावा लागल्यामुळे सदर काम पूर्ण करण्यासाठी माहे मे, २०१९ पर्यंत वाढीव कालावधी मंजूर करावा लागला.

सदर मंजूर करण्यात आलेल्या पुलाच्या सुधारीत संरचना व आराखडा मंजूर करण्याच्या दिनांकापर्यंत (१२ जून, २०१७), कंत्राटीय तरतुदीनुसार सुमारे ४३.७५% इतकी प्रगती आवश्यक असताना फक्त ९.७०% प्रगती संबंधित कंत्राटदार करु शकला. सदर कंत्राटदाराची कामाबाबतची सुमार कामगिरी, त्याची आर्थिक डबघाईची स्थिती, आयकर विभागाकडून सदर कंत्राटदाराच्या नावे असलेला थकीत कर भरणासाठी प्राधिकरणाला प्राप्त झालेले समन्स, बँकांचे थकीत कर्ज वसूल करण्यासाठी Debt Recovery Tribunal (DRT) यांचे आदेश, इतर शासकीय विभागांमधील प्रकल्पांवर असमाधानकारक प्रगती इ. चा विचार करुन संबंधित कंत्राटदाराकडून सदर काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने सदर कंत्राटदार सद्य:स्थितीत सक्षम नसल्याचे दिसून आले.

..२५/-

सदर कामासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध करण्याची विनंती व तसे न झाल्यास कंत्राटीय तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची नोटीस प्राधिकरणामार्फत दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ रोजी कंत्राटदारास निर्गमित करण्यात आली. कंत्राटीय तरतूदीच्या आधारे वाढीव कालावधीनुसार दिनांक ०२ जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्रामध्ये (Extension of Time Limit) नमूद केलेल्या कामाची अपेक्षित प्रगती दर्शविणाऱ्या सुधारीत टप्प्यानुसार (As per Mile Stone) दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत सुमारे ५४.८५% इतकी प्रगती आवश्यक असताना १९.२८% इतकीच प्रगती संबंधित कंत्राटदार करु शकला. सबब, प्राधिकरणाने दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या पत्राद्वारे कंत्राट संपुष्टात आणल्याचे व उर्वरित काम मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. या कंत्राटदाराच्या Risk and Cost वर पूर्ण करण्यात येईल असे त्यांना कळविण्यात आले.

उर्वरित कामाकरीता कंत्राटदार नेमण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली असून नविन कंत्राटदार नेमण्यात आल्याच्या दिनांकापासून १८ महिने या कालावधीमध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांचे कंत्राट रद्द केल्यामुळे त्यांच्याकडून वसुली करावयाच्या रक्कमेपोटी त्यांनी प्राधिकरणाकडे जमा केलेल्या रु.३,६३,६०,०००/- (रुपये तीन कोटी त्रेसष्ट लाख साठ हजार फक्त) इतक्या किंमतीच्या Performance Security च्या बँक हमीचे व त्याप्रमाणे उर्वरित Mobilization Advance च्या वसुलीसाठी मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी प्राधिकरणाकडे जमा केलेल्या रु.१,८९,००,०००/- (रुपये एक कोटी एकोणनव्वद लाख फक्त) इतक्या किंमतीच्या बँक हमीचे रोखीकरण करण्यात आले.

व्यवस्थापकीय संचालक, सिडको व सदस्य, कार्यकारी समिती यांनी मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांना मेट्रोच्या कामासंबंधीची सिडकोने दिलेली दोन कंत्राटे त्यांच्या सुमार कामगिरीमुळे सिडकोमार्फत संपुष्टात आणल्याची माहिती दिली.

कार्यकारी समितीने उपरोक्त सादर केलेल्या सद्य:स्थितीची नोंद घेतली.

..२६/-

**पटल बाब क्र.२ :** **राष्ट्रीय महामार्ग क्र.३ (मुंबई नाशिक महामार्ग) वरील सा.क्र.५५४/७५० माणकोली जंक्शन व सा.क्र.५४९/२०० राजणोली जंक्शन येथील उड्डाणपुलाचे कामी मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इं.लि. यांच्यावरील कारवाई बाबत.**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले कि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या १२९व्या बैठकीत विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र.३ (मुंबई नाशिक महामार्ग) वरील सा.क्र. ५५४/७५० माणकोली जंक्शन व सा.क्र.५४९/२०० राजणोली जंक्शन येथील उड्डाणपूल व संबंधित कामासाठी अंदाजित खर्च रु.१८८.०७ कोटी रक्कमेस मंजूरी देण्यात आली होती. सदर कामासाठी रु.१५७ कोटी इतक्या अंदाजित रक्कमेच्या ठोक पध्दतीने निविदा मागविल्या होत्या. त्या अनुषंगाने मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी सादर केलेल्या रु.१२१ कोटी रक्कमेच्या (निविदा रक्कमेपेक्षा २२.९३% कमी दराची) निविदेस दिनांक ०४ जानेवारी, २०१२ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३३व्या बैठकीत मंजूरी देण्यात आली होती. ठेकेदारास दिनांक १० मे, २०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला. सदर कामाचा निर्धारीत कालावधी पावसाळयासह २१ महिन्यांचा होता.

महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, निविदेच्या मुळ स्वरुपानुसार माणकोली व राजणोली या दोन्ही ठिकाणी ३+३ मार्गिकांचे उड्डाणपूल व दोन्ही बाजूंस प्रत्येकी ७+७ मी. रुंदीचे स्लीप व सेवा रस्ते बांधणे अंतर्भूत होते. ही सर्व कामे राष्ट्रीय महामार्ग, प्राधिकरण यांचे अखत्यारीत असलेल्या ६० मी. रुंदीच्या जमिनीत पूर्ण होणे शक्य होते. मात्र सदर प्रस्तावास मंजूरी देताना ३+३ मार्गिकांच्या उड्डाणपूलाऐवजी ४+४ मार्गिकांचे उड्डाणपूल बांधण्याच्या सूचना भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने दिल्याने कामाच्या वावामध्ये वाढ झाली. यामुळे कामाच्या रक्कमेत रु.१४४.९९ कोटी पर्यंत वाढ झाली. कामाच्या वावामध्ये झालेल्या वाढीमुळे करावे लागलेले भूसंपादन तसेच या भागातील सेवा वाहिन्यांचे स्थलांतरण/सुरक्षा करणे इ. अडचणी माहे एप्रिल, २०१६ पर्यंत दूर झाल्या. कामातील विविध अडचणी लक्षात घेऊन ठेकेदारास ५ वेळा मुदतवाढ देण्यात आली असून शेवटची मुदतवाढ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी पूर्ण झाली असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

सदर कामाच्या सद्य:स्थितीबाबत महानगर आयुक्त यांनी सांगितले कि, माणकोली येथील उजव्या बाजूकडील (मुंबई-नाशिक दिशेकडील) ४ मार्गिकांच्या उड्डाणपूलाचे काम दिनांक ०८ एप्रिल, २०१७ रोजी पूर्ण करुन त्यावरुन दोन्ही दिशेंकडील वाहतूक सोडण्यात आली.

त्यामुळे माणकोली येथील वाहतूकीची कोंडी ब-याच अंशी दूर झाली. उर्वरित काम पूर्ण करण्याकरीता मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांस वेळोवळी सूचना देण्यात आल्या. परंतु, मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या खालावलेल्या आर्थिक स्थितीमुळे त्यांना कामाची आवश्यक प्रगती करता आली नाही. तसेच आयकर विभाग, विक्रीकर विभाग आणि Debt Recovery Tribunal यांचेकडून मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांचेकडील थकीत कर/देणी वसूलीकरिता वांरवार मागणी होत आहे.

महानगर आयुक्त यांनी समितीस अशीही माहिती दिली की, कामाच्या सुरुवातीपासून माहे मार्च, २०१८ पर्यंत एकूण रु.८२ कोटी रक्कमेचे काम पूर्ण झाले होते. तद्नंतर मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांचे खालावलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे माहे मार्च, २०१८ ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत काम अतिशय संथ गतीने सुरु होते. कामातील असमाधानकारक प्रगती लक्षात घेता मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांना दिनांक १६ एप्रिल, २०१८ पासून प्रतिदिन रु.५६,०००/- इतका दंड आकारण्यात आला. तसेच दिनांक ३० मे, २०१८ रोजी निविदेतील कलम १५.१ अन्वये कामाच्या प्रगतीत सुधारणा करण्याची नोटीस देण्यात आली. दंड आकारुन सुध्दा कामाच्या प्रगतीत सुधारणा न झाल्यामुळे मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांचे विरुध्द खालील प्रमाणे दोन टप्प्यांत प्राधिकरणातर्फे कारवाई करण्यात आली.

**अ-१ राजणोली उड्डाणपूलाची उजवी बाजू :-**

राजणोली येथील वाहतूक कोंडींची समस्या तीव्र झाल्याने या ठिकाणची समस्या लवकरात लवकर दूर करण्याच्या दृष्टीकोनातून राजणोली उड्डाणपूलाच्या उजव्या बाजूचे काम दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांचेकडून काढून घेण्यात आले व नव्याने निविदा मागवून काम पूर्ण करण्याचे निश्चित झाले. सदर काम ठेकेदाराच्या रिस्क आणि कॉस्ट वर करुन घेण्याकरीता ठेकेदाराची नेमणूक करण्यासाठी दिनांक २२ सप्टेंबर, २०१८ रोजी अंदाजे खर्च रु.११.९९ कोटी रक्कमेच्या निविदा मागविण्यात आल्या. सदर रक्कम सन २०१०-२०११ च्या दरसूचीवर आधारीत आहे. प्राप्त निविदांमधील लघुत्तम निविदाकार मे.आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. यांची रु.२३.५५ कोटी रक्कमेची निविदा मंजूर झाली असून दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी स्वीकृती पत्र देण्यात आले.

..२८/-

**अ-२ राजणोली व माणकोली उड्डाणपूल व इतर उर्वरित कामे :-**

मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी कामाच्या सुरुवाती पासून माहे डिसेंबर, २०१८ अखेर पर्यंत एकूण रु.८४.७० कोटी रक्कमेचे काम केले असून अदयाप सुमारे रु.३८ कोटी रक्कमेचे काम शिल्लक आहे. मागील नऊ महिन्याच्या कालावधीत ठेकेदाराने केलेले रु.२.७० कोटी इतक्या अत्यल्प रक्कमेचे काम लक्षात घेता उर्वरित काम पूर्ण करण्याकरीता मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे उर्वरित सर्व कामाकरीता मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांचे कंत्राट १४ दिवसांच्या मुदतीनंतर संपुष्टात आणण्याची नोटीस दिनांक २४ डिसेंबर, २०१८ रोजी देण्यात आली. तसेच, मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी सादर केलेल्या रु.२०.३० कोटी रक्कमेच्या बँक हमींचे रोखीकरण करण्याकरीता संबंधित बँकांना दिनांक २४ डिसेंबर, २०१८ रोजी कळविण्यात आले. त्यानुसार संबंधित बँकांकडून संपूर्ण रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट प्राप्त झाले आहेत.

कंत्राट समाप्तीच्या नोटीसीमध्ये नमुद १४ दिवसांचा कालावधी दिनांक ०७ जानेवारी, २०१९ रोजी संपूष्टात येत असून उर्वरित काम मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या रिस्क आणि कॉस्ट वर करुन घेण्याकरीता ठेकेदाराची नियुक्ती करण्याकरिता दिनांक ०८ जानेवारी, २०१९ रोजी निविदा सूचना प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

**(ब) महानगर आयुक्त यांनी मुंबई नाशिक महामार्ग (रा.म.क्र.३) वरील सा.क्र. ५४९/२०० येथील राजणोली उड्डाणपुलाच्या उजव्या बाजूच्या बंधनकारक गाळयाच्या (Obligatory Span) कंपोझिट स्टिल सुपरस्ट्रक्चरचे बांधकाम करणे या कामी मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इं. लि. यांच्यावरील कारवाई बाबत पुढीलप्रमाणे माहिती दिली.**

मुंबई नाशिक महामार्ग (रा.म.क्र.३) वरील सा.क्र.५४९/२०० येथील राजणोली उड्डाणपुलाच्या मुख्य चौकाच्या ठिकाणी बंधनकारक गाळयाचे काम निविदेतील मुळ स्वरुपानुसार कास्ट इन सिटू कॉंक्रिटमध्ये करणे अपेक्षित होते. याकरीता कामाच्या ठिकाणी मोठया प्रमाणावर तात्पुरत्या स्वरुपातील आधार (Support) उभे करावे लागतात. या आधारांमधून चौकातील मोठया प्रमाणावरील वर्दळीची वाहतूक सुरळीतपणे होणे अवघड असल्यामुळे वाहतूक पोलीसांमार्फत या ठिकाणी आधार उभे न करता पुलाचे बांधकाम करण्याची सूचना करण्यात आली. त्यामुळे सदर बंधनकारक गाळयाचे काम कॉंक्रिटमध्ये न करता ते मुळ निविदेतून वगळून कंपोझिट स्टिल सुपरस्ट्रक्चरमध्ये स्वतंत्र निविदा मागवून करण्याचे ठरले. सदर कामास व अंदाजपत्रकीय रू.७.४६ कोटी इतक्या रक्कमेस

दिनांक २८ जून, २०१७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या कामाकरिता दिनांक ०५ जुलै, २०१७ रोजी निविदा मागविल्या असता प्राप्त निविदांमधील लघुत्तम निविदाकार मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी सादर केलेली रु.८.३५ कोटी रक्कमेची निविदा स्विकारण्यात आली. दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देऊन सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने निश्चित करण्यात आला होता. तथापि, निर्धारित ६ महिन्यांचा कालावधी संपुष्टात येऊन सुध्दा कामास सुरुवात देखील होऊ शकली नाही. याकरिता ठेकेदार मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांना प्राधिकरणामार्फत वेळोवेळी सूचना देण्यात आल्या. मात्र, मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या खालावलेल्या आर्थिक स्थितीमुळे त्यांना कामाकरीता आवश्यक स्टील खरेदी करणे तसेच इतरही कोणतीही कार्यवाही सुरु करता आली नाही. तसेच आयकर विभाग, विक्रीकर विभाग आणि Debt Recovery Tribunal यांचेकडून मे.सुप्रिम यांचेकडील थकीत कर/देणी वसूलीकरिता वेळोवेळी मागणी होत असल्याचे महानगर आयुक्त यांनी निदर्शनास आणले.

महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कामास सुरुवात करण्यात होत असलेली दिरंगाई लक्षात घेऊन प्राधिकरणामार्फत दिनांक ०७ सप्टेंबर, २०१८ रोजी मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांना कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आली व प्राधिकरणाच्या दिनांक २४ डिसेंबर, २०१८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित कंत्राटदाराचे कंत्राट संपुष्टात आणण्यात आले. कंत्राट संपुष्टात आणण्याच्या दिनांकापर्यंतच्या १० महिन्यांच्या कालावधीमध्ये कुठल्याही प्रकारचे काम झालेले नव्हते. मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी प्राधिकरणाकडे जमा केलेल्या रु.४१.७५ लक्ष रक्कमेच्या बँक हमीचे रोखीकरण करण्याकरीता संबंधित बँकेस दिनांक २४ डिसेंबर, २०१८ रोजी कळविण्यात आले. त्यानुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी संबंधित बँकेकडून डिमांड ड्राफ्ट प्राप्त झाला आहे. सदर काम मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांच्या रिस्क आणि कॉस्ट वर करुन घेण्याकरीता ठेकेदाराची नियुक्ती करण्याकरिता दिनांक २८ डिसेंबर, २०१८ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली असुन निविदा सादर करण्याचा कालावधी दिनांक २४ जानेवारी, २०१९ आहे.

महानगर आयुक्त यांनी राजणोली व माणकोली उड्डाणपुलांचे कामी मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांचे बाबतीत करण्यात आलेल्या कारवाईबाबत कार्यकारी समितीस वरीलप्रमाणे अवगत केले.

यानंतर, व्यवस्थापकीय संचालक, सिडको व सदस्य, कार्यकारी समिती यांनी सिडको कडील मेट्रोच्या कामाअंतर्गत मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. यांनी केलेल्या दिरंगाई बद्दल सिडको मार्फत त्यांचेवर कंत्राट रद्द करण्याची कारवाई केली असल्याची माहिती दिली.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

****

**जोडपत्र**

**जोडपत्र**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २६०वी बैठक**

**दिनांक : ०५ जानेवारी, २०१९**

**: ठराव :**

"श्री. अरूण बोंगीरवार, शासनाचे माजी मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी निधन झाले. श्री. बोंगीरवार हे दिनांक २५.०५.१९९९ ते २३.०१.२००१ या कालावधीत शासनाचे मुख्य सचिव या नात्याने प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष होते. या काळात श्री. बोंगीरवार यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दु:खद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री. बोंगीरवार यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दु:खात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********